# आता माझे लक्ष ऑलिम्पिककडे : रुचिता गायकवाड

## शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या सायकलिस्ट (माउंटन बाईकर) रुचिताशी संवाद कट्ट्यावर बातचित

**नाशिक । प्रतिनिधी**




राज्य शासनाच्या वतीने नुकत्याच शिवछत्रपती पुरस्कारांचे वितरण झाले. त्यात नाशिकच्या अनेक खेळाडूंचा समावेश होता. त्यातच सायकलिस्ट रुचिता गायकवाड यांना देखील पुरस्कार मिळाला. देशदूतच्या विशेष संवाद कट्ट्यात संपादक डॉ. वैशाली बालाजीवाले यांनी रुचिताशी संवाद साधला.

रुचिताने सांगितले, आम्ही तसे मूळ कोपरगावचे असून सध्या आम्ही नाशिकमध्ये राहतो. माझा लहानपण कोपरगावला गेले. सातवीपासून आम्ही नाशिकला आलो. येथे आल्यावर मला सायकलची खूप आवड निर्माण झाली. वडील बँकेचे काम करायचे, ते दुपारी घरी आल्यावर त्यांची सायकल घेऊन मी फिरायला जायची. माझी पहिली दोस्ती सायकलशी पप्पांच्या सायकलपासूनच झाली. नंतर शाळेतील शिक्षकांनी माझी जिद्द व सायकल चालवायची आवड पाहून माझ्या आई-वडिलांना सल्ला देऊन मला सायकल खेळात करिअर करण्यासाठी प्रोत्साहन दिले. सुरूवातीला खो-खो, रनिंग वगैरे खेळायची मात्र नाशिकला आल्यानंतर फक्त सायकलवर व विशेष करुन माऊंटन बाईक या प्रकारात लक्ष केंद्रित केले. आम्ही दररोज मखमलाबाद ते दुगाव सायकल चालवून सराव करायचो. नंतर हळूहळू पेठरोड आदी भागात देखील आम्ही सरावाला सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात माझ्याकडे स्वतःची सायकल नव्हती. माझ्या वडिलांनी ती पाच हजार रुपये भाड्याने आणली होती. त्याच्यावर मी खूप सराव करून हे यश संपादन केले. सायकलिंग फक्त मजेसाठी करणे आणि स्पर्धेसाठी करणे यात खूप फरक आहे. मजेसाठी करताना बंधनं नसतात, मात्र प्रोफेशन सायकलिंग करण्यासाठी विविध बंधने, नियम असतात. त्यात स्वतःचा परफॉर्मन्स व विविध गोष्टींचा विचार करावा लागतो.

देशदूत कट्टा विशेष

सायकल चालवण्यासाठी फिटनेस खूप महत्वाचा असून त्यासाठी मी रनिंग आणि जिम देखील करते. माझा सकाळीपासून सायंकाळपर्यंतचा दिनक्रम असतो. आम्ही पहिल्यापासून मध्यमवर्गीय कुटुंब असल्याने खर्चिक डायट हा विषय नव्हता. घरातील रोजचे जेवण हेच माझे डाएट. शाळेत असताना मला कांस्य पदक मिळालेले आहे. तर बारावीनंतर सायकल चालविण्याकडे गांभीर्याने पाहायला लागले. २०१९ ला मी प्रोफेशनल सायकलिंगमध्ये उतरले. त्यानंतर दोन वर्ष मी चांगला परफॉर्मन्स करीत विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केले. २०२१, २०२२ व २०२३ मध्ये मला मेडल मिळण्यास सुरुवात झाली. करोना काळात चायनामध्ये स्पर्धा होती, मात्र तिकडे मला जाणे शक्य झाले नाही. २०२३ साली पुन्हा एशियन गेम्ससाठी प्रयत्न केले व तिकडे बक्षीस मिळाले नाही. मात्र मी फिनिश केले होते. मागील पाच वर्षात राज्यस्तरीयसह दहा राष्ट्रीय व एक आंतरराष्ट्रीय पातळीचे पुरस्कार प्राप्त केले आहे.

माझ्या यशात आई-वडिलांचा खूप मोठा सहभाग आहे. आई-वडिलांनी प्रत्येक वेळेला मला खूप सहकार्य केले, विशेष लक्ष दिले आहे आणि आता शिवछत्रपती पुरस्कार मिळाला म्हणजे आई-वडिलांसह शिक्षक व सर्वांच्या मेहनतीचे हे फळ आहे. आता माझे लक्ष आंतरराष्ट्रीय पातळीवर मेडल प्राप्त करणे असून ऑलिम्पिकमध्ये देखील प्रयत्न करून भारतासाठी मेडल आणण्यासाठी प्रयत्न करीत आहे.

# सुला वाईनयार्डस् सीएसडीमध्ये मोठी झेप

## ‘दिंडोरी रिझर्व शिराझ’ सह ४ नवीन वाईन प्रकारांची एंट्री




नाशिक । भारतातील आघाडीच्या वाईन उत्पादक ब्रँडपैकी एक असलेल्या सुला वाईनयार्डस्ने आपल्या प्रीमियम वाईन पोर्टफोलिओचा विस्तार करत, कॅन्टीन स्टोअर्स डिपार्टमेंटमध्ये चार नवीन प्रतिष्ठित वाईन्स सादर केल्या आहेत.

देशातील क्रमांक १ प्रीमियम रेड वाईन दिंडोरी रिझर्व शिराझ, यासह रासा सिरा, द सोर्स ग्रेनेश रोझे आणि सुला रिस्लिंग या तीन नामवंत वाईन्स यापुढे सीएसडीमध्ये उपलब्ध असतील. भारतातील वाढत्या वाईन बाजारात सीएसडीचा वाटा लक्षणीय होत चालला असतानाच, सुला या क्षेत्रात आपले नेतृत्व अधिक बळकट करत आहे. मागील दोन वर्षांत सीएसडीमधील वाईन विक्रीत ४०% वाढ झाली असून, नव्याने समाविष्ट झालेल्या चार वाईन्समुळे सुलाचे एकूण सीएसडी पोर्टफोलिओ आता ९ वाईन्सपर्यंत वाढला आहे. या नव्या वाईन्सची पहिली शिपमेंट मार्च २०२५ मध्ये पाठवण्यात आली आहे.

सुला वाईनयार्डस लिमिटेड ही भारतातील सर्वात मोठी वाईन कंपनी आहे. जी देशांतर्गत वाईन बाजारात ५०% पेक्षा अधिक वाटा राखते. सुलाकडे विविध किमतींमध्ये सुमारे ७० पेक्षा अधिक वाईन लेबले आहेत आणि नाशिक व बेंगळुरूजवळ असलेल्या वाईन-थीम रिसॉर्ट्ससह एक समृद्ध वाईन टुरिझम व्यवसाय आहे. सुला वर्षाला १० लाखांहून अधिक वाईन केसेस देशभर वितरित करते. २००५ मध्ये भारतातील पहिल्या वाईन टेस्टींग रूमचे उद्घाटन आणि २०१० मध्ये पहिल्या वाईनयार्ड रिसॉर्टची स्थापना सुलानेच केली. हे रिसॉर्ट दरवर्षी ४ लाखांहून अधिक पर्यटकांचे आदरातिथ्य करत असल्याचे कंपनीतर्फे सांगण्यात आले.

> दोन वर्षांच्या प्रयत्नांनंतर चार नवीन वाईन्सची सीएसडीमध्ये लिस्टिंग मिळवण्यात आम्हाला यश आले आहे. दिंडोरी रिझर्व शिराझ ही सुलाची सर्वोत्तम रेड वाईनपैकी एक असून, सीएसडीमध्ये तिचा प्रवेश म्हणजे आमच्या प्रीमियम पोर्टफोलिओचा पुढचा मजबूत टप्पा आहे. सुला ही केवळ एक वाईन कंपनी नसून, भारतीय वाईन संस्कृतीच्या परिवर्तनात मार्गदर्शक ठरलेली एक अग्रगण्य ब्रॅण्ड आहे.
>
> **– राजीव सामंत, मुख्य कार्यकारीअधिकारी**

# नामको बँक नामपूर शाखेचे स्थलांतर

**नाशिक ।** दि नासिक मर्चन्ट्स को-ऑप बँकेच्या नामपूर शाखेचे स्थलांतर विद्यमान अध्यक्ष सोहनलाल भंडारी यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ संचालक हेमंत धात्रक होते.



सुमारे ४० कोटी रूपयांच्या ठेवी, २० कोटी रूपयांचे कर्ज बँकेने वाटप केले आहे. बँकेची जायखेडा, लखमापूर आणि ताहराबाद येथे शाखा सुरू करण्याची स्थानिक लोकांची मागणी लक्षात घेऊन एका ठिकाणी शाखाा सुरू करण्यात येईल असे आश्वासन दिल्याचे भंडारी यांनी सांगितले. बँकेचा एनपीए ६ टक्क्यांवर आला.

संचालक महेंद्र बुरड यांनी उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक केले. सुत्रसंचालन संचालक प्रकाश दायमा यांनी केले. याप्रसंगी चारूदत्त खैरनार, संभाजी सावंत, जगदीश सावंत, सुभाष मुथा, सरपंच रेखाताई पवार आदींची बँकेचा गुणगौरव करणारी भाषणे झाली. या कार्यक्रमास उपाध्यक्ष सुभाष नहार, जनसंपर्क संचालिका सपना बागमार, संचालक भानुदास चौधरी, नरेंद्र पवार, आकाश छाजेड, हरीष लोढा, अविनाश गोठी, अशोक आबा सोनजे, रंजन ठाकरे, शितल भट्टड, प्रशांत दिवे, तानाजी जायभावे, संकेत पारख, विश्राम दीक्षित, संजय खिंवसरा, भागचंदजी मुनोत, गणेश छाजेड, नंदन कोकणी, राकेश राका, सुनिता मुथा, हेमंत सांवत, प्रवीण मुथा, सचिन मुथा, विनोद सांवत, नितीन नेर, राजुशेठ बधान, शरद नेरकर, बाजीराव सावंत आदी असंख्य मान्यवर कार्यक्रमास उपस्थित होते.

# मोहन शेटे यांचे व्याख्यान

नाशिक । ‘परशुराम प्रतिष्ठान’च्या वतीने भगवान श्री परशुराम यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी (दि. २८) श्रीमंत बाजीराव पेशवे या विषयावर इतिहास संशोधक मोहन शेटे यांचे जाहीर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. हे व्याख्यान संध्याकाळी ६ वाजता, अखिल मध्यवर्ती ब्राह्मण संस्था, पी.एन.टी कॉलनी, नाशिक येथे होणार आहे. दुसऱ्या दिवशी, भगवान श्री परशुरामांची शोभायात्रा भद्रकाली मंदिर, नाशिक येथून दु. ५ वा. पासून सुरू होणार आहे. या शोभायात्रेची सांगता श्री काळाराम मंदिरात, श्रीराम-श्री परशुराम भेटीने होणार आहे, असे ‘परशुराम प्रतिष्ठान, नाशिक’तर्फे कळविण्यात आले आहे.

## आजचे कार्यक्रम

✻ ठकीशी संवाद ✻
सायं. ६ वा. - कालिदास कलामंदिर

✻ अल्टीमेट बॉलिवूड ड्यूएट्स ✻
युगुलगीतांची मैफल सायं. ६ वा. - प.सा.नाट्यगृह

✻ हरे माधव सत्संग ✻
संध्या. ६ वा. तपोवन लिंकरोड वरील साई श्रद्धा लॉन्स, नाशिक

✻ बंधुभाव हाच धर्म ✻
सायं. ६.३० वा. - विठ्ठल रुख्मिणी मंदिर, गिरणारे गाव

# व्यापारी बँकेचा आज कौतुक सोहळा

**नाशिकरोड । प्रतिनिधी**

नाशिकरोड देवळाली व्यापारी सहकारी बँकेतर्फे रविवारी (दि.२७) सायंकाळी चार वाजता कौतुक सोहळा होणार आहे. त्यात कर्मचाऱ्यांना पुरस्काराने गौरविण्यात येणार असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष दत्ता गायकवाड यांनी पत्रकाव्दारे दिली.

नाशिकरोड येथील जगताप मळ्यातील कदम लॉन्स येथे हा कार्यक्रम होईल. गेल्या आर्थिक वर्षात बँकेने उत्कृष्ट कामगिरी केली. त्यात अधिकारी, कर्मचाऱ्यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी उत्कृष्ट शाखा, उत्कृष्ट शाखा व्यवस्थापक, उत्कृष्ट कर्मचारी आदी पुरस्कार यावेळी प्रदान करण्यात येणार असल्याचे संचालक मंडळाने कळवले आहे.

# कुर्तकोटी सभागृहात सन्मान सोहळा

**नाशिक ।** येथील महर्षी गौतम गोदावरी वेद विद्या प्रतिष्ठान या गुरुकुलाच्या वतीने बुधवारी (दि. ३०) कुर्तकोटी शंकराचार्य जुना गंगापूर नाका नाशिक सभागृहात धर्मगुरू स्वामी श्री अमृताश्रम महाराज यांचे प्रवचन आणि समाजामधील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती महर्षी गौतम गोदावरी वेद विद्या प्रतिष्ठानचे सचिव रवींद्र पैठणे यांनी दिली.

कार्यक्रमात लीना हुन्नरगीकर, नाशिक (संस्कृत सेवाव्रती पुरस्कार), हरिश्चंद्र महाराज पंडित गुरुजी नाशिक,(वारकरी जीवनगौरव पुरस्कार), समीर शेटे (समाजसेवा व्रती पुरस्कार) नाशिक, ज्योतिषाचार्य प्रकाश भूधर नाशिक (ज्योतिष जीवनगौरव पुरस्कार), शुभदा पुराणिक चाळीसगाव ( संस्कृत सेवा जीवनगौरव पुरस्कार ) यांना पुरस्कार दिला जाणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय संस्कृत विश्वविद्यालय नाशिक परिसरचे डायरेक्टर प्रा. डॉ. नीलाभ तिवारी, शृंगेरी मठाचे व्यवस्थापक राम गोपाल अय्यर उपस्थित राहणार आहेत.

# कुंदकेश्वर महादेव मंदिराचा जीर्णोद्धार



**इंदिरानगर । वार्ताहर**

नरहरी नगर,पाथर्डी फाटा येथे श्री कुंदकेश्वर महादेव मंदिराचा जीर्णोद्धार, प्राणप्रतिष्ठा, कलशारोहण सोहळा मोठ्या भक्तीभावात संपन्न झाला. तीन दिवस चाललेल्या या कार्यक्रमांमध्ये भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.


हर हर महादेव, बम बम भोले गजराने परिसर दुमदुमून गेला. देवता मूर्ती, भव्य मिरवणूक, पूजाविधी, होम, यज्ञ, मूर्ती प्राणप्रतिष्ठा व मंदिर जीर्णोद्धार विधी सोहळा तसेच शेवटच्या दिवशी स्वामी श्री विठ्ठलदास महाराज यांच्या हस्ते मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलश सोहळा संपन्न झाला. यावेळी प्रकाशानंद महाराज शास्त्री यांचे शिवकथा वर कीर्तन झाले. राहुल महाराज साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले. तीन दिवसीय कार्यक्रमात भाविकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे स्वागतोत्सुक मदन डेमसे, माधुरी डेमसे होते तर बाकेराव ढेमसे, वैभव वांडेकर, गणेश बने, प्रवीण सोनवणे, भावेश खैरनार, योगेश टोपले, साहिल खडांगळे, दादा मेढे, उमेश साळवे, अजय मंडल, संजय बोराडे, विशाल आहेर, राकेश देवरे यांनी संयोजन केले होते.

# एकाची आत्महत्या

**नाशिक । प्रतिनिधी**

आडगाव शिवारातील म्हाडा सोसायटीत राहणाऱ्या व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केली. कारण स्पष्ट झाले नसून आडगाव पोलीस ठाण्यात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. राहुल प्रल्हाद मोरे (४५ रा. म्हाडा सोसा. न्यू इंग्लिश स्कूल, आडगाव) असे मृताचे नाव आहे. त्यांनी गुरूवारी (दि. २४) राहत्या घरातील बेडरूममध्ये गळफास घेतला. मुलगा प्रथम मोरे याने त्यांना तातडीने मेडिकल कॉलेज येथे दाखल केले असता तपासून मृत घोषित करण्यात आले. तपास जमादार जाधव करीत आहेत.

# अपघातात दोन जण जखमी





**देवळाली कॅम्प ।** लॅमरोडवर कुत्रे वाचवण्याच्या प्रयत्नात रिक्षा व चारचाकी वाहनाचा अपघात झाला. त्यात रिक्षाचालक व एक महिला गंभीर जखमी झाली. रिक्षाचालक समाधान वाळे रा नाशिक हे आपली रिक्षा क्र एम एच १५इफवाय १६३८ ने प्रवासी महिलेसह मंगळवारी सकाळी नाशिकरोड हून भगूर येथील रेणुका माता दर्शनासाठी जात होते. त्याचवेळी सकाळी ८.३० वाजता लेफ्टनंट कर्नल दिनेश वर्मा आर्टिका २३-बीएच ४३६४ ने नाशिकरोड येथे कामावर जात होते. लॅमरोडवरील बहादूरजी सेनेटोरियमजवळ कुत्रे वाचवण्याच्या प्रयत्नात दोन्ही वाहनांची समोरासमोर धडक झाली. स्थानिक नागरिकांनी त्यांना उपचारासाठी रूग्णालयात दाखल केले. पुढील तपास देवळाली कॅम्प पोलीस करीत आहेत.

पान १ वरून...

# पाकिस्तानी न परतल्यास कारवाई : फडणवीस

सापडले तसेच बेकायदा पाकिस्तानी सुद्धा सापडतील असे त्यांनी सांगितले. सिंधू नदी कराराबाबत बोलतानां ते म्हणाले, पाकिस्तानमध्ये तीन-चार पाणी योजना सुरू आहेत. एका दिवसात हे सगळं होत नाही. ज्या पाण्यावर पाकिस्तान अवलंबून आहे, ते जर बंद केले तर पाण्याविना ते तडफडतील.

पहलगाम दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रातील सहा कुटुंबातील व्यक्तींना जीव गमवावा लागला आहे. या सहा परिवाराला निश्चित मदत केली जाईल असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. आसावरी जगदाळे यांनी केलेले वर्णन मन हेलावून जाणारे असून हे सगळे अनाकलनीय असल्याचे ते म्हणाले. दरम्यान,जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या कौस्तुभ गणबोटे आणि संतोष जगदाळे या पर्यटकांच्या घरी जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले.

# थरारक अनुभव घेऊन परतले २५ नाशिककर

त्यांनी विश्वास व्यक्त केला असून, सहल पूर्ण झाल्यानंतर ट्रॅव्हल एजन्सीमार्फत ते परतणार आहेत.तर स्वतंत्रपणे गेलेल्या २५ पर्यटकांचे परतीचे तिकीट आरक्षित करण्यात आले होते. त्यापैकी १८ पर्यटकांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विमानाने मुंबईला आणल्यानंतर ते शुक्रवारी (दि. २५) रात्री नाशिकला दाखल झाले. नवीन नाशकातील सिद्धी मुसळे व सौरभ मुसळे दोघेही पर्यटक सुखरुप परतले असून, उर्वरित ५ जण परतीच्या प्रवासात आहेत. मखमलाबाद, मुंगसरा येथील रवींद्र दराडे, दीपाली दराडे, श्रुतिका दराडे, कृत्तिका दराडे, रोहिदास फडोळ, स्वाती फडोळ, राशी फडोळ, श्रीशां फडोळ, किरण फडोळ, कांचन फडोळ, शौर्या फडोळ, स्वप्नील मानकर, पूजा मानकर, शौर्या मानकर, पार्थ मानकर, ज्ञानेश्वर गटकळ, वैष्णवी गटकळ, श्लोक गटकळ, हे पर्यटकही नाशकात परतले आहेत.

जेलरोड येथील दिनेश पटेल व त्यांचे चौघांचे कुटुंबीय पहलगाम येथे भेट देणार होते. हल्ला झाल्यामुळे तेथे जाण्याचा निर्णय रद्द केला. या काळात पटेल कुटुंबीय श्रीनगर येथे सुखरूप होते. काल विमानाने मुंबई येथे आले व त्यानंतर आपल्या वाहनाने जेलरोड येथे सुखरूप पोहोचले.

# नाशिकचा संदर्भकोश हरपला

गाजवला. लोकहितवादी मंडळ, कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड यासारख्या असंख्य सामाजिक संस्थांशी झेंडे यांचा निकटचा संबंध होता.आण्णा अशी ओळख असलेल्या मधुकर झेंडे यांनी नाशिकच्या चौकांचा इतिहास हे संदर्भ कोश ठरलेले पुस्तक देखील लिहिले. नाशिकच्या सुमारे ७० वर्षांची वाटचाल मुखोद्गत असलेले मधुकर झेंडे हे नाशिकचा संदर्भकोश म्हणून देखील ओळखले जायचे. लोकशाहीर गजाभाऊ बेणी आणि मित्रमंडळींच्या सहकार्याने मधुकर झेंडे यांनी १९६१ साली नाशिकच्या शिवाजी उद्यानामध्ये मास्टर दिनानाथ मंगेशकर यांचा अर्धपुतळा उभारला होता. तेव्हापासून त्यांचे लता मंगेशकर आणि कुटुंबियांशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले होते. सुप्रसिद्ध संगीतकार कल्याणजी आनंदजी, बिनाका गीतमालाचे प्रसिद्ध निवेदक अमीन सायानी यांसह अनेक दिग्गजांशी झेंडे यांचे घरोब्याचे संबंध होते. नाशिकच्या सहा कुंभमेळ्यांचे ते साक्षीदार होते.

# पेन्शन गणनेवेळी आधीचा सेवा कालावधी मोजू शकत नाही

२० जून १९८७ रोजी त्यांची सेवा समाप्त करण्यात आली. त्यांनी त्या सेवा समाप्तीला शाळा संबंधित न्यायाधीकरणापुढे आव्हान दिले होते. न्यायाधिकरणाने पुन्हा कामावर रुजू करून घेण्याबाबत आदेश देण्यास नकार दिला. त्याऐवजी याचिकाकर्त्या डॉ. मधु यांना भरपाई म्हणून एक महिन्याचा पगार देण्याचे निर्देश महाविद्यालयाला दिले.

त्या निर्णयाला आव्हान देत डॉ. मधु यांनी रिट याचिका दाखल केली.

डॉ. मधू यांची सुरुवातीची नियुक्ती राखीव पदावर तात्पुरती होती व ती कोणत्याही रिक्त पदाच्या जागी नसल्याने रद्द केली होती. या वस्तुस्थितीवर बोट ठेवत खंडपीठाने डॉ. मधू यांच्यातर्फे ज्येष्ठ वकील मिहीर देसाई यांनी केलेला युक्तिवाद फेटाळला.

# तत्कालिन बँक मॅनेजरचा जामीन फेटाळला

## साडेपाच कोटी रुपयांच्या अपहारप्रकरणात अटक होणार

**नाशिक । प्रतिनिधी**

गंगापूररोडवरील थत्तेनगर येथील बँक ऑफ महाराष्ट्राच्या ॲग्री हायटेक शाखेत कार्यरत तत्कालीन शाखाधिकारी संशयित सुभाष विठ्ठल कौटे (रा. पंचवटी) यांना आर्थिक गुन्हे शाखेकडून आता कधीही अटक केली जाऊ शकते. जिल्हा व सत्र न्यायालयाने त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावल्याने ईओडब्ल्यू केव्हांही कारवाई करणार आहे.

१० जानेवारी २०२३ ते २५ जुलै २०२४ या कालावधीत कौटे यांनी त्यांच्या एकूण ३६ खातेदारांची कर्ज प्रकरणे मंजूर करताना संगनमताने बनावट कागदपत्रांच्याआधारे कर्ज मागणीची रक्कम कमी असताना ती जास्त दाखविली. तसेच कर्ज खाते नसतानाही ते कर्ज खाते असल्याचे भासविले आणि अनुदानाची रक्कम मंजूर करून ती कर्जदारांच्या बचत खात्यावर वर्ग करून एकूण ५ कोटी, ५५ लाख, ६६ हजार, ५१३ रुपयांचा अपहार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला होता. याप्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून केला जात आहे. दरम्यान, न्यायालयाने सरकारी पक्षाची बाजू ग्राह्य धरुन कौटे यांचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर केला, अशी माहिती सरकारी वकील रवींद्र निकम यांनी दिली.

> **असा आहे प्रकार**
>
> कौटे यांनी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (सीएमइजीपी) या योजनेतील एकूण ३६ लाभार्थ्यांपैकी १९ लाभार्थ्यांना बँकेकडे जिल्हा उद्योग केंद्रातर्फे शिफारस करण्यात आली होती. परंतु त्याप्रमाणे कोणतेही कर्ज वाटप करण्यात आले नाही. मात्र, १६ पात्र लाभार्थी यांना बँकेतर्फे कोणतेही कर्ज वाटप केलेले नसतानाही शासनातर्फे अनुदान मिळण्यासाठी बनावट कर्ज वितरण प्रमाणपत्र व बँकेचे विवरणपत्र पोर्टलवर अपलोड करून जिल्हा उद्योग केंद्राला पाठविण्यात आले. त्याबाबतचे कागदपत्रे बँकेतर्फे प्राप्त करण्यात आले आहेत. त्याद्वारे एकूण रक्कम ३ कोटी, ११ लाख, ८३ हजार, ७५० रुपयांचे अनुदान मिळवून शासनाची व बँकेची फसवणूक करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

# अवैध सावकार राणेकडून १३ लाखांचा मुद्देमाल हस्तगत



**नवीन नाशिक ।** अवैध सावकार मुन्ना राणे याच्याकडून पोलिसांनी एक ट्रॅक्टर व एक चारचाकी वाहन असा सुमारे १३ लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला.

अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध सावकारी करून फिर्यादीचे चारचाकी वाहन ताब्यात घेऊन त्याची परस्पर विल्हेवाट राणे याने लावली होती. अंबड पोलीस ठाण्यात अवैध सावकारी प्रकरणी संशयित विवेक उर्फ मुन्ना बरसु राणे हा फरार होता. याप्रकरणी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, उपायुक्त परिमंडळ २ मोनिका राऊत, सहायक आयुक्त शेखर देशमुख,अंबड पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राकेश हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक नितीन फुलपगारे तपास करत होते. फुलपगारे यांना मुन्ना हा पाथर्डी फाटा परिसरात येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यावरून किरण गायकवाड, राहुल जगझाप, अनिल गाढवे, सचिन करंजे, राकेश पाटील, मयूर पवार, स्वप्निल जुंद्रे, तुषार मते, संदीप भुरे, दीपक निकम, समाधान शिंदे, सागर जाधव, घनश्याम भोये, प्रवीण राठोड, विष्णू जाधव, संदीप डावरे, दीपक पाटील यांच्या पथकाने सापळा रचून मुन्नाला ताब्यात घेतले.

पोलिसांनी त्याला विश्वासात घेत त्याच्याकडून माहिती घेतली असता त्याने त्याचा मित्र नीलेश जाधव यांनी नागरिकांना व्याजाने पैसे देवून त्यांच्याकडून मारूती बलोनो कार, इनोव्हा क्रिस्टा, जॉन्डिअर कंपनीचा ट्रॅक्टर व टाटा कंपनीचा ४०७ टॅम्पो गहाण ठेवला असल्याची माहिती दिली. पोलिसांनी मुन्ना राणेंच्या ताब्यातून एकूण १३ लाख रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

> मुन्ना राणे किंवा यांच्यासारख्या अन्य अवैध सावकारांपासून कुणाही नागरिकांना त्रास होत असेल तर त्यांनी तत्काळ अंबड पोलिसांशी संपर्क साधावा. त्यांच्या समस्यांचे पोलिसांकडून निरसन केले जाईल.
>
> **-शेखर देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, अंबड विभाग**